# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ०९.०६.२०२६ मंगळवार**

**मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात ''ऑपरेशन थंडर'' अंतर्गत गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक. १,४९,७९,८३७/— रुपयांचा मुद्देमाल जप्त :**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०९.०६.२०२६ चे पहाटे ०४.३० वा. ते ०७.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा, सामाजिक सुरक्षा विभागाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, सापळा रचून, पोलीस ठाणे पारडी हद्यीत भंडारा—नागपूर हायवे हैद्राबाद रिंग रोड लगत, पारडी येथील जोगेंदरसिंग ढाब्यासमोर, नाकाबंदी करुन पंचासमक्ष एका अशोक लेलॅन्ड ट्रक क्र. ओडी ३४ एच ४४८९ ला थांबवून त्यातील चालक व त्याचे सोबतचा यांना त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नांवे १) जोगेश धर्मोधर देवूरी वय ३० वर्षे, २) महेंद्र हुरदा देवूरी वय ४० वर्ष दोन्ही रा. कठानिहा किसननगर, जि. अंगोल, भुवनेश्वर, ओडीसा असे सांगीतले. पंचासमक्ष एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांचे ताब्यातील ट्रकची झडती घेतली असता, त्यामध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी १५० किलो ५२० ग्रॅम गांजा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, मोबाईल व ट्रकमधील स्टीलचे कॉईल असा एकुण १,४९,७९,८३७/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्यांचे पाहिजे आरोपी साथिदार बाबाजी डेहरा रा. तीरसुरीया, जि. कटक, भुवनेश्वर ओडिसा व विष्णुप्रधान रा. डकवामुंडा, ओडिसा याचे मदतीने गांजा आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगून वाहतुक करतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पारडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि शिवाजी ननवरे, पोहवा समाधान गिते, किशोर

ठाकरे, प्रकाश माथनकर, लक्ष्मण चवरे, नापोअं शेषराव राऊत, पोअं. अश्विन मांगे, कुणाल मसराम, समीर शेख, कुणाल बोडखे यांनी केली.



स्वा/—
( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.